Pune Police

**प्रेसनोट दि. १३/०६/२०१७**

**खुनाच्या गुन्हातील पाहिजे असलेल्या सराईत गुन्हेगारा कडून देशी बनावटीचे एक पिस्टल व एक काडतूस युनिट १ गुन्हे शाखेच्या टिम कडून हस्तगत.**

गुन्हे शाखेच्या युनिट १ पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नामचिन गुंड व खूनाच्या गुन्हयातील मुख्य सुत्रधार नामे शशीकांत नामदेव घुले, या सराईत गुन्हेगारास रंगेहाथ पकडून त्याचेकडून ०१ देशी बनावटीचे पिस्तूल, ०१ काडतूस व यामाहा आर वन ५ मोटार सायकल असा मुद्येमाल जप्त करण्यात आली आहे.

वरिष्ठ पो. निरीक्षक श्री. नितीन भोसले पाटील, यांचेसह युनिट १ गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हयातील आरोपींचा शोध घेणेकामी खडक पोलीस ठाणेचे हद्दीत फिरत असतांना पो.शि. गजानन सोनुने व स.पो.फौज. रविंद्र कदम यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, खडक पोलीस ठाणे येथील खूनाच्या गुन्हयातील सराईत गुन्हेगार नामे शशीकांत नामदेव घुले, हा वस्ताद लहुजी साळवे चौकाजवळ, पिंपळेश्वर शिवशंकर मंदीर, पुणे येथे त्याचेकडील बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगून मोटार सायकलवर फिरत आहे.

त्यानूसार युनिट १ च्या पथकाने सदर ठिकाणी छापा मारून आरोपी नामे शशीकांत नामदेव घुले, रा. विठ्ठल रुख्मिनी मंदीरा जवळ, कालीदास घुले चाळ, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे यास सापळा रचून पकडून त्याचेकडून ०१ देशी बनावटीचे पिस्टल, ०१ काडतूस व ०१ इंम्पोर्टेड मोटार सायकल असा एकूण १,७०,०००/- रु. किंमतीचा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचेकडे अधिक चौकशी करता सदरचा आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर खडक पोलीस ठाणे येथे खूनाचा ०१ गुन्हा, भोसरी पोलीस ठाणे येथे खूनाचा प्रयत्न ०१ गुन्हा, सांगवी पोलीस ठाणे येथे जबरी चोरीचा एक गुन्हा, हवेली पोलीस ठाणे येथे बेकायदेशीर रीत्या शस्त्र बाळगणे ०१ गुन्हा, तसेच दुखापत व गर्दी/मारामारीचा ०१ गुन्हा असे गुन्हे दाखल असून तो दोन वेळा येरवडा जेलमध्ये राहून आला आहे.

**सदर आरोपी हा खडक पोलीस ठाणे येथे गेली ०८ महिन्यापासून खुनाच्या गुन्हयात फरारी होता. तसेच सांगवी पोलीस स्टेशन येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल असून त्यामध्ये तो गेली ०४ वर्षापासून वॉटेड आहे, तसेच हवेली पोलीस स्टेशनला गर्दी/मारामारीचा गुन्हा दाखल असून त्यामध्ये सुध्दा तो गेली ०२ वर्षापासून वॉटेड आहे.**

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त सो., गुन्हे, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त सो., गुन्हे. श्री सुरेश भोसले, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पो उप निरी. दिनेश पाटील, पो.शि. गजानन सोनुने, स.पो.फौज. रविंद्र कदम, संभाजी भोईटे, कैलास गिरी, सुरेश उगले, पो.हवा. प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, रिजवान जिनेडी, उमेश काटे, विजय झगडे, अशोक माने, तुषार खडके, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, सुधाकर माने, सुभाष पिंगळे, प्रशांत गायकवाड, मोहन येलपले, यांनी केली आहे.


गुन्हे शाखा
युनिट-१
पुणे शहर